MHKO100001062023

## आदेश निशाणी क्र. २४ वर

प्रतिवादी क्र.१ यांनी सदरचा अर्ज मनाई अर्जास सादर केलेले म्हणणे वादीच्या दाव्यास कैफियत म्हणून संबोधीत करावी व कैफियत म्हणून स्वीकृत करावी म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे त्याच अर्जावर दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी यांचेविरूध्द दिनांक ३०.०३.२०२४ रोजी विना कैफियतचा आदेश झाला आहे. प्रकरण लांबणीवर टाकण्याकरीता कैफियत देण्यास टाळाटाळ केली आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा. यदाकदाचित न्यायाचे कारणास्तव अर्ज मंजूर करणेचा झालेस प्रतिवादी यांना ५०००/- कॉस्ट करण्यात यावी.

३. प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

४. वादी यांनी सदरचा दावा वाटपाकरीता व कायम मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ यांनी मुदतीत कैफियत दिली नाही म्हणून त्यांचेविरूध्द विना कैफियत आदेश दिनाकं ३०.०३.२०२४ रोजी पारीत करण्यात आला आहे. असे असताना प्रतिवादी यांनी विना कैफियत आदेश रद्द करून घेणे आवश्यक होते परंतु त्यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे मनाई अर्जास दिलेले म्हणणे कैफियत म्हणून

स्वीकृत करण्याकरीता दिला आहे. वादी यांनी अर्जातील कथने शपथेवर केली आहेत. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रस्तुत प्रतिवादी यांनी मनाई अर्जास दाखल केलेले म्हणणे कैफियत म्हणून अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी सदरचा अर्ज दाखल करण्यास उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर काहीअंशी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१) प्रतिवादी क्र.१ यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र.१ यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांनी मनाई अर्जास दिलेले म्हणणे त्यांची कैफियत म्हणून स्वीकृत करण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.07.01 17:29:16 +0530
Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.07.01

ठिकाण – गडहिंग्लज　　　　　　डी. एम. पवार
दिनांक – ०१/०७/२०२५　　　　दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज